# जय महाराष्ट्र !

# पोवाडा : २८ :

## नमन

शिवाजींच्या महाराष्ट्रा, उदो रे उदो ॥ ध्रु० ॥ टिळकांच्या रे महाराष्ट्रा, उदो रे उदो॥ जोतिबांच्या महाराष्ट्रा, उदो रे उदो ॥ क्रांतिकारका महाराष्ट्रा, उदो रे उदो ॥ ज्ञानदेवाच्या महाराष्ट्रा। नामदेवाच्या महाराष्ट्रा । चोखामेळ्याच्या महाराष्ट्रा । एकनाथाच्या महाराष्ट्रा । तुकारामांच्या महाराष्ट्रा।रामदासांच्या महाराष्ट्रा। मल्हारींच्या महाराष्ट्रा उदो ! रे उदो ! ॥

● ●

## चौक १ ला

झालं स्वप्न आज साकार । महाराष्ट्रा जयजयकार ॥ जी॥ संपन्न देश असतील । किती फुलतील । किती होतील । परि मज महाराष्ट्र हा प्यार । अभिमान मला वाटतो फार । पोवाडा **पांडुरंग** गाणार ॥जी॥ महाराष्ट्र जीव कीं प्राण । नाहीं उपमान । राखण्या मान । महाराष्ट्राचा देईन प्राण । त्याच्यासाठीं माझं जीवन । त्याच्यासाठीं माझं चिंतन । गुंतला प्राण ॥ जी ॥ चाल ॥ महाराष्ट्रा ! तुझं वर्णन सांगतों तुला ॥ हा समुद्र करतो स्पर्श तुझ्या पायाला ॥ माणीक मोती उधळितो तुझ्या चरणाला ॥ येतो लाटालाटानं नित्य तुला भेटायाला ॥ तुझ्या शूरपणाची साक्ष देतो सकळाला ॥ महाराष्ट्रा ! तुझ्यावर हल्ला कोणी जर केला । तर लाटांनीं बुडविन त्याला । असं सांगतो दरिया दुनियेला। आंग्र्यांचं



आरमार फाडी शत्रुहृदयाला ॥ देवगड जयगड कासाकिल्ला बाजुला ॥ विजयदुर्ग सिंधुदुर्ग खडे पहारा करण्याला ॥ चाल ॥ रायगड, राजगड, प्रतापगड, सिंहगड, कमळगड, भैरवगड, वैराजगड, सज्जनगड, पन्हाळगड, राजमाची, विशाळगड, पुरंदरगड–हे किल्ले अलंकार तुला ॥ चाल ॥ महाराष्ट्रा, माझा तूं प्राण । तुझ्यावीण माझं मरण । तूंच माझं सारं जीवन । तुझ्यावीण मला ना चैन ॥ तूं माझा, मी तुझा, जाण । तुझ्यासाठीं देईन प्राण ॥ आकाश पडेल भूमिला । तो मृत्यु भिवत्रील मला । दगडांचा वर्षाव जरि झाला । जरि वीज कडाडुन आली जीव घेण्याला । सोसाट्याचा वादळी वारा । जरि आला प्राण घेण्याला । तरि नाहीं सोडणार तुला । पृथ्वीच्या पाठीवर गेलों कुठं जरी भटकायला । तरि तूंच माझ्या हृदयांत चमकता तारा ॥ १ ॥

● ●

## चौक २ रा

स्वातंत्र्याची ज्योत चमकते नयनानयनांत । पाहुनी तिजला दुश्मन् सारे थर थर थर करित ॥ स्वातंत्र्याचा टिळा लावला तुजला शिवबानें । बहुमोलाचे साज चढविले बाजीरावानें ॥ तानाजीनं ज्योत लावली सिंहगडावरती । बाजीप्रभुनें पावन केली गजाखिंड पुरती ॥ विजयि शिवाजी घोडीवरुनी जिथं जिथं गेला । रम्य फुलांचा सडा पसरला त्या त्या जागेला ॥ रानावनांतुन रानफुलांनीं सुवास पसरविला । शुभ्र फुलासम यश राजाचं मोहवि सकळाला ॥ जी ॥ चाल ॥ अटकेपार झेंडा नेला । भीमथडीचा घोडा उडाला । सिंधु नदीचें पाणी प्याला । महादजी शिंदांनीं सारा । उत्तर भारत काबीज केला । इतिहास तुझा हा आण आतां चित्ताला ॥ २ ॥

● ●

## चौक ३ रा

महाराष्ट्राची सुरम्य भूमी पिकवी कसल्या धान्याला । आतां सांगतों ऐका जन हो! जागं करोनी कानाला ॥ जी ॥ ॥ चाल ॥ कोंकणप्रांतीं तांदुळ झाला । आंबे, अमसुल, फणस चांगला । काजू मटामट भक्षायाला । आंवळे आंबट चाखायाला । नारळ मंगलकार्यी आला । सुपारी चटचट चघळायाला । किती औषधी दऱ्याखोऱ्याला । सागवृक्ष किती भरूनी गेला ॥ १ ॥ घाटावरती धान्यें पिकतीं । सांगिन आतां तीं तुम्हांला । भुईमुग, मटकी, गहू, जुवारी । मूग, पावटे, वाल, बाजरी । मका, करडी, स्वच्छ पांढरी । तीळ, काराळे, तूर चांगली । चणे, वाटाणे, मसूर डाळी । ऊस बागांनीं मजाच केली ॥ २ ॥ भाजीपाल्याची चंगळ झाली । भेंडी, पडवळ, कडू कारलीं । मेथी, मिरची किती वळवळली । हिरवीं, लाल वसईचीं केळीं । लसूण कांद्यानं बहार केली । वांगीं कृष्णा-कांठिं चांगलीं । गोल बटाटे लाल रताळीं । टामाटोंनीं मजा उडवली । काटेकाकर्डी वेलावरलीं । डोकावत किती छान तोंडलीं । अंत नसे या धनधान्याला । कशी करूं यादी मी बोला । किती फुलांचा जमला मेळा । यत्न करोनी वैभवशिखरीं । चढवा पुनरपि महाराष्ट्राला ॥ ३ ॥

● ●

## चौक ४ था

पंढरी महाराष्ट्रांत । वैकुंठ असे प्रख्यात ॥ ठेवुनिया कटिवरि हात । पांडुरंग जागत येथ ॥ अगणीत भक्त भजनांत । नित्य येथ तन्मय होत ॥ चाल ॥ भक्तीचा तरु हा फुलला । वर भक्त-विहंगम बसला । भजनांतरिं रमुनी गेला । धन्य धन्य पंढरी होत ॥ जी ॥ ज्ञानेश्वर चोखामेळा । नामदेव गोरा सन्त ॥ एकनाथ, पाठक तैसे । दामाजी विठ्ठलभक्त ॥ तो तुकाराम देहूचा । देहासह निघुनी जात ॥ चाल ॥ नामाचा भरला गजर । तो मृदंग झणझण टाळ । तो वीणारव मंजूळ ॥ चाल ॥ देहभान



विसरुनि जात । हें क्षेत्र महाराष्ट्रांत ॥ जी ॥ या वारकरी पंथाची । संतांनीं दीक्षा दिधली ॥ भेदभाव विसरुनि सारे । धर्माच्या छत्राखालीं ॥ हा ब्राह्मण किंवा शूद्र । हा भेद नसे त्या काळीं ॥ चाल ॥ पंढरीराय सर्वांचा । पंढरीराय भक्तांचा । हा विठ्ठल महाराष्ट्राचा ॥ चाल ॥ ही असे जागती ज्योत । वैकुंठ महाराष्ट्रांत ॥ जी ॥ ती भवानी तुळजापुरची । जगदंबा कोल्हापुरची ॥ आदिशक्ति या विश्वाची । ही स्फूर्ती सामर्थ्याची ॥ देवता शूर वीरांची । ही महाराष्ट्र देशाची ॥ चाल ॥ तो जेजुरिचा मल्हारी । मार्तण्ड भक्त कैवारी । संकटें तोडुनी सारीं ॥ चाल ॥ भक्ताला सद्गति देत । मल्हारी महाराष्ट्रांत ॥ जी ॥ गाणगापुरीं गुरुदत्त । चिरशांति मनाला देत । नरसोबावाडी क्षेत्र । श्रीकृष्णातटिं विख्यात ॥ औदुंबर गुरु दत्ताचें । आवडतें स्थान पवित्र ॥ चाल ॥ श्रीक्षेत्र आळंदी थोर । जेथ राही ज्ञानेश्वर । तें संतांचें माहेर ॥ चाल ॥ पतितांना पावन करित । हीं सारिं महाराष्ट्रांत ॥ जी ॥ तें महाबळेश्वर साचें । जें ज्योतिर्लिंग शिवाचें ॥ त्र्यंबकेश निज भक्तांचें । हरि संकट तें कायमचें ॥ नाशीक रामचंद्राचें । तें आवडतें स्थळ वसतीचें ॥ चाल ॥ त्या कृष्णा, गोदा, भीमा । कोयनाहि ती सुखधामा । सावित्री, वेणा, परमा, ॥ चाल ॥ नीरा, प्रवरा, जल देत । या नद्या महाराष्ट्रांत ॥ **रामदास** सद्गुरु मोठे । सज्जनगडिं वसती झाली ॥ **दासबोध** लिहुनी ज्यांनीं । कर्मयोग-दीक्षा दिधली ॥ अति तीव्र तपस्या करुनी । राष्ट्राची सेवा केली ॥ स्थापुनिया मठ अगणीत । धर्माची उजळुनि ज्योत । धर्माला उजळा देत ॥ चाल ॥ श्रीसमर्थ शिवगुरु होत । हे सन्त महाराष्ट्रांत ॥ ४ ॥

● ●

## चौक ५ वा

महाराष्ट्र हा शिवरायाचा सत्याचा अन् शौर्याचा । त्यागी जीवन जीवन याचें संतांच्या सुविचारांचा ॥ महाराष्ट्राचा नाश कराया दुस्मन

धावुनिया आले । शिवरायाचे शूर मावळे झुंजाया सत्वर गेले
भारतियांचें रक्षण करण्या महाराष्ट्र धांवुन गेला । अटकेवरती झेंडे ला
पानपतीं संग्रामाला ॥ पानपतावर अपयश आलं तरि न मरा
डगमगला । **माधवराव, महादजी** यांनीं पुन्हां दरारा बसवीला ॥ इं
आला तराजू घेऊन उत्तर भारत जिंकियला । महाराष्ट्र परि जिंकाया
अवजड झालं त्या वेळा ॥ नाना फडणिस नांव ऐकुनी इंग्रज कासा
झाला । नाना गेले इंग्रजांनीं मग महाराष्ट्र काबिज केला ॥ चाल ॥ प
देशभक्तिची ज्योत । महाराष्ट्रहृदयीं तेवत ॥ इंग्रजानं देश जिंकला
पण शल्य मराठी हृदयाला । जागजागीं क्रांतिचा वणवा भड
लागला ॥ वासुदेव बळवंत वीर । तसे बाळ गंगाधर ॥ कान्हेरे क
झुंजार । तसे वंद्य सावरकर । असे कैक चमकले वीर । देशाला वाहि
शीर ॥ गांधीजींनीं लढा सुरू केला । महाराष्ट्र चालला आघाडीला
हज्जारों वीरानी आत्मयज्ञ सुरू केला ॥ कैकांना धाडलं तुरुंगाला
कैकांच्या फांस कंठाला । १९४७ ला । पारतंत्र्य गेलें अस्ताला । भा
पुन्हां तेजानं चमकूं लागला ॥ महाराष्ट्र आला जन्माला । १
१९६० ला । आनंदी आनंद झाला साऱ्या जनतेला ॥ ५ ॥

● ●

## चौक ६ वा

महाराष्ट्र असे हा देश संतवीरांचा । जोतिबा फुले, भाऊराव क
वीरांचा । बाबासाहेब आंबेडकरांचा । सद्गुणी धैर्यवंताचा पापभीरूंचा
लौकिक असा मनिं ठेवा महाराष्ट्राचा ॥ जी ॥ चाल ॥ यत्न करो
महाराष्ट्राला चढवा वैभवशिखराला । जगदंबेची शपथ घेउनी आठवु
शिवरायाला ॥ जातियतेचें जहर भयंकर । या पचवोनी होवुनि शंकर
क्षुद्र भावना जाळुनि टाका थोर बुद्धिला द्या थारा । सद्गुणरूपी
माणकें दिसोत जागोजागेला ॥ उच्चनीचता दूर करा । एकी करू



पुढें चला । पूर्वज तुमचे थोर तयांचे वंशज तुम्ही मनीं धरा । कलंक लागेल त्या थोरांना असें कांहिंही कधिं न करा ॥ अथांग भरला सागर तैसे अथांग प्रेमळ हृदयांत । सह्यगिरी हा निश्चल तैसे निश्चळ व्हा तुम्हीं चित्तांत ॥ असंख्य तारे हे झगमगती रम्य अशा आकाशांत । असंख्य सद्गुण लुकलुकोत हे त्यांच्यासम जनहृदयांत ॥ कर्तबगारी दिसेल मोठी जेव्हां जेव्हां अनिवार । गाइल यश ते तेव्हां तेव्हां **पांडुरंग** हा शाहीर ॥ ६ ॥

रचना—१–५–१९६०.